स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय :

छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास

संशोधक :

मेघा भास्कर ढवळे

(नांदेड)

मार्गदर्शक :

डॉ. मारोती दशरथ कसाब,

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर.

ऑगस्ट - २०२३

’छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास’

प्रस्तावना :

‘साहित्य’ हा शब्द कल्पनाप्रधान कलाकृतीसाठी वापरला जातो. या शब्दाचे मूळ ‘Littera’ या लॅटीन शब्दापासून ‘लिटरेचर’ असा शब्द निर्माण झाला. याचा अर्थ वर्णमालेतील अक्षर वा अक्षरे असा होतो. म्हणजेच साहित्यामध्ये बोलल्या गेलेल्या वा लिहिल्या गेलेल्या सर्वच अक्षर रचनांचा समावेश होतो. म्हणजेच जे वाणीमय ते ‘वाङ्मय’. वाङ्मयालाच ‘साहित्य’ म्हटले जाते. ‘साहित्य’ हे भाववाचक नाम मराठीत ‘सहित’ या विशेषणापासून बनलेले आहे. ‘सहित’ या शब्दाचा अर्थ ‘एकत्र ठेवलेले’ असा होतो. साहित्यासाठी मराठीत ‘वाङ्मय’, सारस्वत, विदग्ध वाङ्मय, ललित वाङ्मय अशा पर्यायी संकल्पना वापरल्या जातात.

साहित्यातून समाजाचे सहहित साधले जाते. साहित्यकृती ही जीवनाशी निगडीत अशी सृजनशील निर्मिती आहे. साहित्य हे समाज, संस्कृती व वाङ्मय यावर अवलंबून असते. रा.ग. जाधवांनी स्वातंत्र्य, मानवतावाद, आत्माविष्कार, उद्‌बोधन यांना साहित्य निर्मितीच्या प्रेरणा मानल्या आहेत. अशा या साहित्याचे मराठीत दोन भेद केले आहेत. त्यामध्ये एक ललित वाङ्मय व दुसरा ललितेत्तर वाङ्मय होय.

ललित वाङ्मय हे लेखकाच्या सृजनशीलतेतून, प्रतिभेतून निर्माण झालेले असते. यामध्ये व्यक्ती, घटना, प्रसंग, स्थळ, वास्तवातील घटकांचा मूळ आधार घेतला असला तरी त्यातून साकारणारे साहित्य लेखकाची कल्पक निर्मिती असते. ‘ललित’ या शब्दाचा अर्थ सौंदर्य, सुरेख, मनमोहक असा आहे. प्रा. रा.ग. जाधव यांच्या मते ‘‘प्रतिभाशक्तीने प्रेरित केलेले व आनंद देणारे लेखन म्हणजे ललित साहित्य होय.‘’

अशा या साहित्याचे ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, दलित साहित्य असे प्रकार पहावयास मिळतात. यातील साहित्य हे दलित जाणीवेतून निर्माण झालेले साहित्य आहे. दलित साहित्य म्हणजे ‘दलितांचे जीवन, त्यांची दुःखे याविषयी कोणत्याही लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजे

दलित साहित्य होय.’

‘‘दलित जाणिवेतून लिहिले गेलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.’’

दलित साहित्याबाबत बाबुराव बागूल यांनी मानवमुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य आहे त्याला दलित साहित्य म्हणावे असे मत व्यक्त केले आहे. या साहित्याच्या मुळाशी विद्रोही जाणीवा असतात. दलित साहित्य हे दलित म्हणजे मागासवर्गीयांच्या जीवन जाणिवा साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करते. दलित साहित्य हे फक्त दलितांनीच लिहिलेले साहित्य असते असे नाही, तर दलितांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी इतरांनीही दलित साहित्य निर्माण केले आहे. दलित साहित्याच्या उगमाचा विचार करता या साहित्याची सुरुवात ही खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीपासून पहावयास मिळते. तसेच आंबेडकरांपूर्वीचा विचार करता संत चोखामेळा यांच्या साहित्याचा विचार करावा लागतो. त्यांनी आपल्या अभंगातून ईश्वर भक्तीबरोबरच समाजातील विषमतेची जाणीव व्यक्त केली आहे. अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बंधु माधव, बाबुराव बागूल, दया पवार असे काही दलित साहित्यकार उदयास आले. यामध्ये इ.स. २००० च्या नंतर छाया बेले ह्या दलित स्त्रीवादी साहित्यिका म्हणून नावारुपाला आल्या आहेत. छाया बेले यांनी दलित कथा, कादंबरी, कविता घेऊन २००० नंतर महाराष्ट्रात दलित स्त्रीवादी साहित्यात मोलाची भर टाकली आहे.

विषय निवडीमागील भूमिका :–

छाया बेले यांनी आपल्या साहित्यातून दलित अशिक्षीत, शिक्षीत, स्वतंत्र असणारी, बंदीस्त इत्यादी स्त्रियांच्या मनाचा शोध घेऊन आपल्या कल्पनाविश्वातून चार कविता संग्रह व दोन कथासंग्रह व एक कादंबरी लिहिली तसेच बालसाहित्य व इतरही स्फूट लेखन केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील लेखिका छाया बेले यांनी २००० पासून साहित्य लेखनास सुरुवात केली. यांनी २०१२ ला ‘लढाई अस्तित्वाची’ हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित केला. त्यानंतर त्यांनी ‘चकवा’ कथासंग्रह २०१५ ला प्रकाशित केला. हे पुस्तक ‘राज्य ग्रंथ निवड समितीने शासन मान्य ग्रंथालयाकरीता

शिफारस केलेली आहे. आणि त्यानंतर त्यांचा ‘वैशाख वणवा’ हा कथासंग्रह पहायला मिळतो. यानंतर २०१८ ला ‘घर याचे हृदयी माझ्या’ हा कवितासंग्रह अस्तित्वात आला. यानंतर अतिशय उत्कृष्ट अशी मानवी जीवनाचे चित्रण, स्त्री संवेदना, शिक्षणाचे महत्त्व सांगणारी ‘फरफट’ ही कादंबरी २०२० साली प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर ‘हॅप्पी होमच्या भींतीआड’ हा कवितासंग्रह आलेला आहे. यानंतर ‘स्त्रीयांनी परतायला हवं.’ हा कवितासंग्रह पाहायला मिळतो.

लेखिका छाया बेले यांनी दलित स्त्री ही आपल्या लेखनाचा केंद्रबिंदू मानून आपले लेखन केले. स्त्री वेदना तसेच स्त्री व तिच्यावर होणारा अत्याचार, पुरुषांकडून होणारा अपमान, अवहेलना, हिंसा अशा विकृती, त्यांच्या ‘कुठंही नाहीत नोंदीच्या फायली’, ‘वळकटी’, ‘सप्तपदी’ आदी कवितातून पहावयास मिळते. तसेच आईवडिलांची महती सांगणाऱ्या ‘आई फक्त तुझ्यासाठी’, ‘आई’, ‘असा असतो बाप’, ‘आर्जव’, ‘उणिव’, ‘ऋणाईत’, ‘घरटं’ इत्यादी कविता आहेत. तसेच माणसाचे मन, भावना, निसर्गसौंदर्य या विषयावर लेखिकेने अतिशय कल्पकतेने आपल्या कविता लिहिल्या आहेत.

लेखिका छाया बेले यांच्या कथा ह्या दलित निरक्षर स्त्री, सुशिक्षीत स्त्रीची फसवणूक, अन्याय, रुढी, परंपरा, अत्याचाराला विरोध करणारी स्त्री, स्वर्णांकडून होणारा दलित स्त्रीचा छळ, दलित स्त्रीच्या व्यथा, कष्ट, भूकबळी, अंधश्रद्धा, रुढी- परंपरेमुळे होणारे स्त्रीवरील अत्याचार यांचे वर्णन केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन केले आहे.

लेखिका छाया बेले यांची २०२० साली नावारुपाला आलेली ‘फरफट’ ही कादंबरी सगुणा आणि कचरी या दलित निरक्षर स्त्रीयांच्या जीवनाची फरफट या कादंबरीतून स्पष्ट झालेली आहे. मात्र गरीबीतून वर निघण्याचा प्रयत्न कचरीचा मुलगा श्रावण हा पोलीस अधिकारी बनून करतो.

असा छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा ओघवता आढावा पहायला मिळतो. म्हणून दलित स्त्रीवरील पूर्वी होणारे अन्याय- अत्याचार व आज होणारे रुप बदलून आलेले अन्याय- अत्याचार यांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण या स्त्रीला अशा अनेक रुपाने येणाऱ्या अन्याय- अत्याचाराविरुद्ध लढा देण्यासाठी सक्षम बनवणे गरजेचे आहे, म्हणून लेखिका छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा

चिकित्सक अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

संशोधनाची उद्दीष्टे :-

१) एका लेखकाच्या संशोधनात्मक अभ्यासातून एखादा लेखक का लिहितो त्याची कारणे समजून घेणे.

२) लेखक म्हणून झालेल्या व्यक्तीच्या जडणघडणीचा शोध घेणे.

३) एका लेखकाच्या समग्र साहित्य कृतीतून त्याच्या व्यक्तीमत्त्वाचा शोध घेता येतो का हे पाहणे.

४) एक लेखक विविध साहित्य प्रकारातून लिहित असताना साहित्य प्रकारानुसार त्याच्या अभिव्यक्तीचे प्रकटीकरण झाले आहे का हे समजून घेणे.

५) स्त्रीयांच्या जीवनातील सुख-दुःखांची नोंद मराठी साहित्यात घेतली आहे का? याचा शोध घेणे.

६) प्रस्तुत संशोधनाच्या निमित्ताने एका वंचित समूहातील लेखिकेला समीक्षात्मक न्याय मिळवून देणे.

७) लेखिका छाया बेले यांच्या साहित्यातील समग्र मानवीमूल्यांचा धांडोळा घेणे आणि त्यांच्या साहित्याची सामाजिक परिवर्तनासाठीची उपयोगिता लक्षात घेणे.

याशिवाय समकालीन समाज जीवनाचे प्रतिबिंब लेखिका छाया बेले यांच्या साहित्यात कितपत पडले आहे आणि साहित्यातील पात्रांना लेखिकेने कितपत न्याय दिला आहे, याचाही शोध या शोध प्रबंधाच्या निमित्ताने घेण्यात येईल. भाषिकदृष्ट्या लेखिकेचे सामर्थ्य तपासता येईल. वाङ्मयीन प्रकाराच्या योग्य निवडीचाही विचार करता येईल. प्रस्तुत शोध प्रबंधातून लेखिकेच्या लेखन सामर्थ्याचा आणि उणिवांचाही शोध घेतला जाईल.

संशोधनाची गरज :–

प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे दलित कथा, कादंबरी, कविता यांच्या लेखनाचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन लेखिका छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक शोध घेणे ही संशोधनाची गरज आहे. दलित स्त्री, सुशिक्षीत स्त्रीची फसवणूक, स्त्री संवेदना, स्त्रियांवरील पुरुषांचे अत्याचार, सवर्णांचे अत्याचार, अशिक्षीत स्त्री, बंदिस्त स्त्री मन, अत्याचाराविरुद्ध लढा देणारी स्त्री, अन्याय, रुढी, परंपरेला विरोध करणारी स्त्री याचा अभ्यास करणे व शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टांचा अभ्यास करणे आणि आई, वडिल, निसर्ग, मानवी मनांचा अभ्यास करुन दलित स्त्रीला सक्षम बनविणे व स्त्री– पुरुष भेद नष्ट करणे यासाठी या संशोधनाची गरज आहे, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

संशोधनाची व्याप्ती :–

या शोध प्रबंधाची व्याप्ती लेखिका छाया बेले यांच्या कविता, कथा, कादंबरी आदी कलाकृतींचा दलित व स्त्री जाणीवेच्या दृष्टीकोणातून अभ्यास करणे ही संशोधनाची व्याप्ती आहे, म्हणून छाया बेले यांच्या 'लढाई अस्तित्वाची', 'घर याचे हृदयी माझ्या', 'हॅप्पी होमच्या भिंतीआड', 'स्त्रियांनी परतायला हवं' हे चार कविता संग्रह व 'वैशाख वणवा', 'चकवा' हे दोन कथासंग्रह आणि 'फरफट' या कादंबरीच्या आधारे संशोधन करण्यात येणार आहे.

अभ्यास मर्यादा :–

छाया बेले यांच्या कथांचा (''चकवा'' व ''वैशाख वणवा'' कथासंग्रह) आणि कवितांचा ('घर याचे हृदयी माझ्या' व 'लढाई अस्तित्वाचा' कवितासंग्रह) व 'फरफट' या कादंबरीच्या विशेषांचा अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. छाया बेले यांनी लिहिलेल्या कथा व कविता हे या संशोधनासाठी लिखीत सामग्री आहे. प्रस्तुत अभ्यास हा एका लेखिकेभोवती फिरणारा असल्यामुळे तसेच दलित व स्त्री जाणिवेच्या विशिष्ट मर्यादित केला जाणारा आहे. असे असूनही तो सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

गृहितके

१) छाया बेले यांच्या साहित्यात स्त्री संवेदना आलेल्या आहेत.

२) छाया बेले यांच्या साहित्यात नातेसंबंधांचा वेगळेपणा पहावयास मिळतो.

३) छाया बेले यांचे साहित्य स्त्रीयांना प्रेरित करणारे आहे.

४) छाया बेले यांच्या साहित्यात उपेक्षित, वंचितांसाठी शैक्षणिक प्रेरणा दिसतात.

५) छाया बेले यांच्या साहित्यात रुढी, परंपरा, अंधश्रद्धेने ग्रासलेला दलित समाज आहे.

६) छाया बेले यांच्या साहित्यात शेतकरी व कष्टकऱ्यांची हलाखीची परिस्थिती पहावयास मिळते.

७) छाया बेले यांच्या साहित्यात सुशिक्षीत स्त्रीवर अत्याचार झालेला आहे.

८) छाया बेले यांच्या साहित्यात स्त्रीच्या बदलत्या स्वरुपाचा अन्याय– अत्याचार पहावयास मिळतो.

९) छाया बेले ही वंचित समूहातील लेखिका प्रस्थापित समिक्षकांकडून दुर्लक्षित राहिलेली आहे.

१०) छाया बेले यांचे समग्र लेखन समता, बंधुता, न्याय आणि मानवता ही मूल्ये प्रस्थापित करणारे आहे.

संशोधनाचे महत्त्व :

दलित साहित्यामध्ये अगदी कमी दलित स्त्री साहित्य लेखिका पहायला मिळतात. त्यात हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, गुणाबाई गाडेकर, बेबीताई कांबळे, प्रज्ञा दया पवार, सुरेखा भगत अशा स्त्रियांनी दलित साहित्य लेखन केले आहे. यामध्ये २००० नंतर नावारुपाला आलेल्या छाया बेले याही एक दलित साहित्य लेखिका आहेत. त्यांनी आपल्या स्वानुभावातून दलित स्त्री संवेदना, कथा, कादंबरी, कवितांच्या माध्यमातून मांडला आहे. तसेच स्वर्ण वर्गाकडून व पुरुष वर्चस्व या दोन अत्याचाराखाली घुसमट झालेले स्त्री मन त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाच्या निदर्शनास आणण्यास मदत केली आहे, म्हणून छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास करुन त्या साहित्याला न्याय मिळवून देण्यासाठी हे संशोधन कार्य महत्त्वाचे आहे.

संशोधनाची साधने :

१) प्रस्तुत संशोधनासाठी छाया बेले यांचे मूळ कविता संग्रह ‘लढाई अस्तित्वाची’, ‘घर याचे हृदयी माझ्या’, ‘हॅपी होमच्या भिंतीआड’, ‘स्त्रियांनी परतायला हवं’ आणि ‘चकवा’ व ‘वैशाख वणवा’ हे कथासंग्रह आणि ‘फरफट’ ही कादंबरी यांचा आधारभूत साधन म्हणून वापर करण्यात येईल.

२) छाया बेले यांच्याशी चर्चा करुन मिळालेल्या माहितीची प्रबंधामध्ये वस्तुनिष्ठ मांडणी करण्यात येईल.

३) ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाचा वापर करण्यात येईल.

४) प्रसार माध्यमांचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची पद्धती :

'छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास' करीत असताना माहितीच्या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. तसेच वर्गीकरण, विश्लेषण, संश्लेषण, मुलाखत, तौलनिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

संभाव्य निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे 'दलित' या संज्ञेचा अर्थ समजण्यास मदत होऊन 'दलित साहित्य' या प्रकाराचा पूर्णपणे अर्थ समजण्यास मदत होईल. तसेच लेखिका छाया बेले यांच्या समग्र साहित्याच्या माध्यमातून दलित स्त्री- संवेदना, अत्याचार, अन्याया विरुद्ध लढा देणाऱ्या स्त्रीच्या माध्यमातून स्त्री बल पहावयास मिळते. तसेच जीवनातील संकटांना झुंज देऊन वर येऊ पाहणारा दलित वर्ग पहायला मिळेल.

प्रकरण रचना

प्रकरण १ ले : लेखिका छाया बेले यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण.

प्रस्तावना, छाया बेले यांचा वैयक्तिक परिचय, जन्म, छाया बेले यांची शैक्षणिक जडण– घडण, लेखन प्रवास, वैयक्तिक जीवन जडण– घडण, मिळालेले पुरस्कार, छाया बेले यांचे समाजातील स्थान.

प्रकरण २ रे : छाया बेले यांचे साहित्य : प्रेरणा व स्वरुप

- छाया बेले यांच्या समग्र साहित्याचे स्वरुप
- छाया बेले यांच्या कथेतील प्रेरणा
- कवितेतील प्रेरणा आणि कादंबरीतील प्रेरणा.

प्रकरण ३ रे : छाया बेले यांच्या कवितांचे स्वरुप आणि विशेष.

- छाया बेले यांच्या कवितांचे वर्गीकरण – निसर्ग कविता, सामाजिक कविता, स्वरुप व विशेष.
- समाजसुधारकांच्या कवितांचे स्वरुप व विशेष.
- स्त्रीवादी कवितांचे स्वरुप व विशेष.
- दलित कवितांचे स्वरुप व विशेष.
- प्रेम कवितांचे स्वरुप व विशेष.

प्रकरण ४ थे : छाया बेले यांच्या कथा लेखनाचे स्वरुप आणि विशेष.

- कथा स्वरुप आणि विशेष.
- छाया बेले यांच्या दलित कथेचे स्वरुप आणि विशेष
- परंपरा, रुढीवर आधारित कथा, सुशिक्षीत स्त्री अत्याचारावर आधारीत कथांचे स्वरुप आणि विशेष.
- अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या स्त्री कथांचे स्वरुप आणि विशेष.
- शेतकऱ्यांवर आधारित कथांचे स्वरुप आणि विशेष

प्रकरण ५ वे : छाया बेले यांचे कादंबरी लेखन व इतर स्फुटलेखन.

- स्फुटलेखनाचा अर्थ व विशेष.
- समिक्षा लेखनाचा अर्थ विशेष.
- छाया बेले यांच्या बाल साहित्याचे स्वरुप व विशेष.

प्रकरण ६ वे : छाया बेले यांच्या समग्र साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन.

- समकालिन लेखिका आणि छाया बेले यांच्या साहित्याचे वेगळेपण.
- दलित साहित्याच्या दृष्टीने छाया बेले यांच्या साहित्याचे वेगळेपण.
- छाया बेले यांच्या साहित्याचे स्त्रीवादी साहित्याच्या दृष्टीने वेगळेपण.

प्रकरण ७ वे : निष्कर्ष व समारोपात्मक विवेचन

'छाया बेले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधाचा अभ्यास करण्यासाठी एकूण सात प्रकरणांची रचना करण्यात आली असून, पहिल्या प्रकरणातून छाया बेले यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली हे स्पष्ट केले जाईल. दुसऱ्या प्रकरणातून छाया बेले यांच्या साहित्यातून मिळालेल्या प्रेरणा व त्याचे स्वरुप स्पष्ट करण्यात येणार आहे. तिसऱ्या प्रकरणातून छाया बेले यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या कवितांचे स्वरुप व समाजाच्या व साहित्याच्या दृष्टीने विशेष स्पष्ट करण्यात येणार आहे. चौथ्या प्रकरणामधून कथा स्वरुप व तिचे समाज व साहित्याच्या दृष्टीने महत्त्व अभ्यासण्यात येणार आहे. प्रकरण पाच मध्ये छाया बेले यांचे कादंबरी लेखन व इतर स्फुट लेखन अभ्यासण्यात येणार आहे. प्रकरण सहामधून हाती आलेले निष्कर्ष व छाया बेले यांच्या समग्र साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करणार आहे. प्रकरण सातमधून सबंध प्रकरणाचा अभ्यास करुन निष्कर्ष व समारोप करण्याचे योजिले आहे.

संदर्भग्रंथसूची :

१) बेले छाया – ‘लढाई अस्तित्वाची’ (कवितासंग्रह) साद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, ०१ जुलै २०१२.

२) बेले छाया – ‘चकवा’ (कथासंग्रह), मुक्तरंग प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती १४ एप्रिल २०१५.

३) बेले छाया – ‘वैशाख वणवा’ (कथासंग्रह), संगत प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती २८ नोव्हेंबर २०१८.

४) बेले छाया – ‘घर याचे हृदयी माझ्या’ (कवितासंग्रह) मुक्तरंग प्रकाशन लातूर, पहिली आवृत्ती १ जानेवारी २०१८.

५) बेले छाया – ‘फरफट’ (कादंबरी), यशोदीप पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २८ डिसेंबर २०२०.

६) बेले छाया – ‘हॅप्पी होमच्या भींतीआड’ (कवितासंग्रह), साहित्याक्षर प्रकाशन अहमदनगर. प्रथम आवृत्ती, १४ जुलै २०२३

७) डॉ. कदम ज्योती – ‘एकविसाव्या शतकारंभीची मराठी कविता आणि कवी’ (संपादन, सर्वोदय प्रकाशन, नांदेड), प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २०१९.

८) बेले छाया – ‘स्त्री जाणीवा व स्त्री संवेदनाः एक अभ्यास’, साहित्याक्षर प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, ११ ऑगस्ट २०१९.

९) बेले छाया – ‘स्त्रियांनी परतायला हवं’, (कवितासंग्रह) साहित्याक्षर प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, १ ऑगस्ट २०२३.

१०) https://vishwakosh.marathi.gov.in>....

११) http://ir.unishivaji.ac.in>jspui (PDF)

१२) http://chhayabele.blogspot.com/2023/05/blog.post_10html

मार्गदर्शक

संशोधक

डॉ. मारोती दशरथ कसाब
सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
मराठी विभाग
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर.

मेघा भास्कर ढवळे,
(नांदेड)